# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिकेच्या विविध कामे/उपक्रमाच्या जाहिरात निर्मिती
**{जनसंपर्क विभाग}** आणि वितरणासाठी एजन्सी नियुक्ती/मुदतवाढीबाबत.

नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या निविदा सूचना, जाहिर सूचना, दर्शनी जाहिराती व अन्य जाहिराती तयार करुन वर्तमानपत्रे, टी.व्ही. (प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडीया) इत्यादी प्रसार माध्यमाद्वारे प्रसारीत करण्यासाठी म.न.पा.च्या पॅनलवर स्थायी समिती ठराव क्रं. ३६४, दि. ०३.०६.२०२२ अन्वये १. मे. अमित ॲडव्हरटाझिंग एजंन्सी २. मे. प्रॉफीट ॲडव्हरटायझर्स (इंडिया) प्रा. लि. नागपूर या दोन एजंन्सीची नियुक्ती करण्यात आलेली होती.

उपरोक्त नियुक्तीचा कालावधी दि. १९.०६.२०२४ रोजी संपुष्ठात आलेला आहे. जाहिरात एजंन्सी नियुक्ती करीता पुढिल दोन वर्षाकरीता निविदा प्रक्रीया राबविण्यासाठी मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे दि. २८.०६.२०२४ च्या मंजुरीनुसार ठराव पारीत करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

तसेच जाहिरातीचे कामे खोळंबू नये म्हणून नविन एजंन्सीची नियुक्ती होईपर्यत विद्यमान एजन्सीला जून्याच अटी व शर्तीवर समप्रमाणात कामे विभागून देण्याचा प्रश्न विचारात घेणे. प्रस्तुत खर्चासाठी जनसंपर्क विभागाचे (सा.प्र.विभाग) पद क्र. A20100120308 मध्ये तरतुद करण्यात आली आहे.
टिप :- सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 917/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 14/07/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहाय्यक आयुक्त (साप्रवि), जनसंपर्क विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या विविध कामे/उपक्रमाच्या जाहिरात निर्मिती आणि वितरणासाठी एजन्सी नियुक्ती/मुदतवाढीबाबत.

नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या निविदा सूचना, जाहिर सूचना, दर्शनी जाहिराती व अन्य जाहिराती तयार करुन वर्तमानपत्रे, टी.व्ही. (प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडीया) इत्यादी प्रसार माध्यमाद्वारे प्रसारीत करण्यासाठी म.न.पा.च्या पॅनलवर स्थायी समिती ठराव क्रं. ३६४, दि. ०३.०६.२०२२ अन्वये १. मे. अमित ॲडव्हरटाझिंग एजंन्सी २. मे. प्रॉफीट ॲडव्हरटायझर्स (इंडिया) प्रा. लि. नागपूर या दोन एजंन्सीची नियुक्ती करण्यात आलेली होती.

उपरोक्त नियुक्तीचा कालावधी दि. १९.०६.२०२४ रोजी संपुष्ठात आलेला आहे. जाहिरात एजंन्सी नियुक्ती करीता पुढिल दोन वर्षाकरीता निविदा प्रक्रीया राबविण्यासाठी मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे दि. २८.०६.२०२४ च्या मंजुरीनुसार ठराव पारीत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन, (प्रस्तुत खर्चासाठी जनसंपर्क विभागाचे (सा.प्र.विभाग) पद क्र. A20100120308 मध्ये तरतुद करण्यात आली आहे.)

तसेच जाहिरातीचे कामे खोळंबू नये म्हणून नविन एजंन्सीची नियुक्ती होईपर्यत विद्यमान एजन्सीला जून्याच अटी व शर्तीवर समप्रमाणात कामे विभागून देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.